महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट : https:mahasanskruti.org ई-मेल: mahaculture@gmail.com
दुरध्वनी क्र. ०२२-२२८४२६३४/७० ०२२-२२०४३५५०

---

प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाकरिता सहाय्यक अनुदान देण्यासाठी पात्र संस्थाकडून मुंबई, कोकण विभाग, पुणे विभाग, नाशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर विभाग, अमरावती व नागपूर विभागातून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ज्या संस्था गायन, वादन, नृत्य, नाटक, तमाशा, नकला, कठपुतलीचे खेळ तसेच लोककला या क्षेत्रात सांस्कृतिक कार्यक्रमाचे जनतेसाठी नि:शुल्क सादरीकरण करेल अशा संस्था अर्ज करु शकतील.

संस्थांनी चुकीचे कागदपत्रे सादर करुन सहाय्यक अनुदान प्राप्त केल्याचे आढळून आल्यास सदर संस्था भविष्यात शासनाच्या अनुदानासाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच सदर संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी https://mahaanudan.org या शासकीय संकेतस्थळावर नवीन नोंदणीवर अर्ज करता येतील. तसेच अर्ज व नियम https://mahaanudan.org या शासकीय संकेतस्थळावर नवीन संदेश या सदरात सांस्कृतिक संस्थांना सहाय्यक अनुदान या शिर्षाखाली उपलब्ध होतील. सदर अर्ज दि. ०८ मे, २०२६ ते दि.०८ जून, २०२६ या कालावधीत ऑनलाईनरित्या उपलब्ध असतील.

सही /-
संचालक, सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन